पुढारी | शुक्रवार
६ फेब्रुवारी २०१५



दोडामार्ग : विद्यार्थ्यांना पदवी प्रदान करताना प्रा. विजय फातर्फेकर, डॉ. पाटील, नाईक व अन्य. (छाया : रत्नदीप गवस)

# शिक्षण ही आजन्म चालणारी निरंतन प्रक्रिया : प्रा. फातर्फेकर

**दोडामार्ग : वार्ताहर**

'पदवी' मिळविणे हा एका शिक्षण प्रक्रियेतील टप्पा आहे. कारण आयुष्याच्या अंतापर्यंत शिक्षण हे सुरू असते. मनुष्य हा आजन्म विद्यार्थीच असतो, असे प्रतिपादन ग्रंथालय व शैक्षणिक चळवळीतील कार्यकर्ते प्रा. विजय फातफेकर यांनी केले.

दोडामार्ग येथे लक्ष्मीबाई सीताराम हळबे महाविद्यालयात आयोजित पदवीदान समारंभात प्रमुख वक्ते म्हणून ते बोलत होते. संस्था सदस्य भाई परमेकर, नियामक समिती सदस्य विवेकानंद नाईक, प्रा. डॉ. व्ही. ए. पाटील, प्रा. दिलीप बर्वे आदी उपस्थित होते.

प्रा. फातर्फेकर म्हणाले, निसर्ग, पर्यावरण, झाडे-झुडपे, पशुपक्षी, यांचा आपण मानवतावादी दृष्टीतून विचार करतो का? याचे उत्तर होकारार्थी असेल तरच आपण सुशिक्षित झालो असे म्हणता येईल. प्रत्येकाने निसर्गाचा सन्मान करायला शिकले पाहिजे. निसर्ग हाच विश्वाच्या केंद्रस्थानी आहे. अणुउर्जाही आपली गरज नाही. ३० टक्के कॅन्सर हा प्रदुषणकारी कारखाने, मोटारी यातून निघणाऱ्या विषारी वायुमुळे होतो. कोणतेही काम करायला लाजू नका. श्रमिक संस्कृतीचा आदर करा. गोरगरीबांना मदत करा. त्यांना जाणून घ्या. एक आदर्श नागरीक बना. तरच खऱ्या अर्थाने आपल्याला सुशिक्षित म्हणता येईल, असे ते म्हणाले.

प्रास्ताविक करताना प्रा. डॉ. पाटील यांनी मुंबई शहराच्या विकासाला कारणीभूत ठरलेल्या घटकांचे विवेचन केले. मुंबईशहर व विद्यापीठाचा इतिहास कथन केला. मुंबई विद्यापीठाचा पहिला दीक्षांत समारंभ १८६१ मध्ये झाला. यावेळी बी.ए. परीक्षेत बसलेल्या १० पैकी ४ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. प्रथम श्रेणीतील उत्तीर्ण झालेल्या दोन विद्यार्थ्यांत न्यायाधीश व संस्कृत भाषेचे पंडित झालेल्या म. गो. रानडे यांचा समावेश असल्याची आठवण त्यांनी करून दिली. यावेळी मुंबई विद्यापीठात झालेल्या दीक्षांत समारंभाचे प्रमुख पाहुणे प्रसिध्द शास्त्रज्ञ डॉ. अनिल काकोडकर यांच्या भाषणाची चित्रफीत दाखवण्यात आली. प्रा. फातर्फेकर यांचा हस्ते विद्यार्थ्यांना पदवी प्रदान करण्यात आली. सूत्रसंचालन प्रा. एम. टी. बेग यांनी तर आभार प्रा. बर्वे यांनी मानले.